अनुजा अभ्यंकर

'हम आप के है कौन' या लोकप्रिय सिनेमात माधुरी दीक्षित तिच्या बहिणीच्या लग्नात मेहुण्यांचे बूट पळवते तो प्रसंग अनेकांच्या लक्षात असेल. माधुरीचं अनुपम सौंदर्य आणि त्याबरोबरच भोवती असलेलं दिमाखदार वातावरण. हा सिनेमा प्रदर्शित झाला आणि नंतरच्या लग्नसोहळ्यांमध्ये नवऱ्यामुलीच्या बहिणींनी नवऱ्यामुलाचे बूट पळवायचे अशी नवी प्रथा सर्रास सुरु झाली. मेंदी आणि संगीत या प्रथाही अशाच सिनेमातून आलेल्या. पण या नव्या प्रथांबरोबरच आपल्याकडचा लग्नसोहळाही सिनेमात दाखवतात तसाच दिमाखदार वातावरणात व्हावा यासाठी लोकांची धडपड सुरु झाली. नेमकं याच काळात माहिती तंत्रज्ञान क्षेत्र भारतात विकसित होत गेलं आणि एक मोठा वर्ग मध्यमवर्गाकडून उच्च मध्यमवर्गात गेला. साहजिकच सोहळे दिमाखदार करण्यासाठी अनेकांच्या हातात त्यासाठी लागणारा पैसाही आला. पण पैशांबरोबरच असा शानदार सोहळा करायचा तर वेळही हवा आणि कल्पकताही हवी. या दोन्ही गोष्टी एकत्रितपणे सगळ्यांकडे असण्याची शक्यता तशी कमीच. काही कल्पक उद्योजकांनी लोकांची हौस आणि अडचण ओळखली आणि एका नव्या उद्योगाचा जन्म झाला. तो उद्योग म्हणजे लग्नांसाठी इव्हेंट मॅनेजमेंट. पुण्यातील अनुजा अभ्यंकर आणि त्यांची रॉयल वेडिंग्ज ही कंपनी हाच उद्योग करते, लग्नसोहळा देखणा करण्याचा.

अनुजा अभ्यंकर यांना लहानपणापासूनच शाळेतल्या कार्यक्रमांच्या नियोजनात सहभागी होण्याची आवड होती. शाळेचं गॅदरिंग, सोसायटीतला गणेशोत्सव अशा सार्वजनिक कार्यक्रमात त्या अगदी हिरीरीने भाग घेत असत. कल्पकता आणि सौंदर्यदृष्टी या गोष्टी अंगभूतच असल्याकारणाने प्रत्येक कार्यक्रम अधिक सुंदर कसा होईल याकडे त्यांचं लक्ष असायचं. वाढत्या वयाबरोबर ही आवड आणि कला वाढतच गेली. त्यामुळेच इव्हेंट मॅनेजमेंट या विषयात त्यांनी मास्टर्स डिग्री मिळवली. इव्हेंट मॅनेजमेंटचा असा अभ्यासक्रम पूर्ण करणारी त्यांची ही पहिलीच बॅच. खरं तर त्यावेळेपर्यंत आपल्याकडे इव्हेंट मॅनेजमेंटचं फारसं प्रस्थ नव्हतं. त्यामुळे या विषयातलं शिक्षण घेणं हे तसं धाडसाचंच होतं. हे शिकून पुढे काय करणार असा प्रश्न सगळ्यांच्याच मनात येणं स्वाभाविक होतं. तरी पण अनुजा यांच्या आईवडिलांनी त्यांना इव्हेंट मॅनेजमेंट करण्यापासून परावृत्त केलं नाही हे विशेषच. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यामुळे शिक्षणादरम्यान अनुजा यांना फेमिना मिस इंडिया अॅवॉर्ड आणि तशा स्वरुपाच्या समारंभांचं

वृषाली जोगळेकर
vrushali.joglekar@uniquefeatures.in

'युनिक फीचर्स'मध्ये कार्यरत असून उद्योजकता विकासासह विविध विषयांवर लेखन करतात

सिनेमाचा प्रभाव पूर्वीपासूनच समाजावर होता आणि अजूनही आहे. पण आधी तो फक्त वेषभूषा आणि केशभूषा इतक्यापुरताच मर्यादित होता. अलीकडच्या काही वर्षांपासून मात्र रोजच्या जगण्यावागण्यात त्याचं प्रतिबिंब पडलेलं दिसतं. अगदी लहानसहान प्रसंग, सणवारसुद्धा साधेपणाऐवजी झगमगीत पद्धतीनं साजरे करण्याकडे लोकांचा कल वाढलेला दिसतो. त्यामुळेच 'सेलिब्रेशन' आणि 'काहीतरी हटके' हे सध्याच्या पिढीचे परवलीचे शब्द झालेले आहेत. लग्नसोहळाही त्याला अपवाद नाही.

लग्नसोहळा देखणा करणारा उद्योग

इव्हेंट मॅनेजमेंट कसं केलं जातं हे प्रत्यक्ष अनुभवायला मिळालं. कारण या अभ्यासक्रमात थिअरी आणि प्रॅक्टिकल अशा दोन्ही गोष्टींचा समावेश होता.

रितसर शिक्षण झालं आणि काही दिवस अनुभव घ्यावा या हेतूने इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीत नोकरी करावी असं त्यांनी ठरवलं. पण त्याकाळात एकतर फारशा मोठ्या कंपन्या अस्तित्वात नव्हत्या आणि छोट्या कंपन्यांमध्ये मिळणारा कामाचा मोबदला समाधानकारक नव्हता. मग अनुजा यांनी ओळखीपाळखीतून छोटी छोटी कामं मिळवायला सुरुवात केली. त्याकाळात मिळणारी कामं प्रामुख्याने कंपन्यांची असत. कंपन्यांचे काही मेळावे, बक्षीस वितरणाचे कार्यक्रम वगैरे. घरगुती स्वरुपाच्या कार्यक्रमात काही खास लोकांचे वाढदिवस सोडले तर इव्हेंट मॅनेजमेंटला फारसा स्कोप नव्हता. पण वर म्हटल्याप्रमाणे लोकांच्या हातात पैसा आला आणि हौसेला मोल नसतं या म्हणीचा प्रत्यय वारंवार यायला सुरुवात झाली. घरात होणारा प्रत्येक सोहळा सर्वांपेक्षा वेगळा असावा, अविस्मरणीय व्हावा यासाठी जणु चढाओढ सुरु झाली. त्यामुळे इव्हेंट मॅनेजमेंट कंपन्यांकडे भरपूर कामं यायला सुरुवात झाली. साहजिकच अनुजा यांनाही कामं मिळायला सुरुवात झाली. मूळातच कार्यक्रम उत्तम कसा होईल याची जाण असल्याने त्यांनी केलेल्या कामाला मौखिक प्रसिद्धी मिळत गेली. अशातच एका लग्नाच्या इव्हेंट मॅनेजमेंटसाठी त्यांच्याकडे चौकशी झाली. अनुजा यांनी त्या कामाचं अक्षरश: सोनं केलं. तिथलं त्यांचं काम बघून त्यांच्याकडे याबाबतीत आणखी विचारणा व्हायला लागली आणि तिथून त्यांच्या लग्नासाठी इव्हेंट मॅनेजमेंट या स्वतंत्र उद्योगाला सुरुवात झाली.
लग्न ठरलं की अनुजा यांच्या कामाला सुरुवात होते. लग्नाच्या पूर्ण सोहळ्याचं कंत्राट त्या घेतात. त्यात अगदी घराची सजावट, पौरोहित्य करणारे गुरुजी, पुजेची तयारी, वधुवरांची कपडे खरेदी, मेंदी, बांगड्या, ब्युटी पार्लर, केटरिंग, लग्नासाठी व्हेन्यू ठरवणं, त्याचं डेकोरेशन, आलेल्या पाहुण्यांचं आदरातिथ्य अशा सगळ्या गोष्टींची जबाबदारी रॉयल वेडिंग्ज घेते. त्यासाठी त्यांची स्वत:ची चाळीसएक जणांची टीम आहेच पण त्याशिवाय बाहेरच्या छोट्यामोठ्या किमान पंचवीसएक उद्योजकांची मदत त्या घेतात. त्यात मंडप डेकॉरेटर्स, सनई, लाईट डिझाईनर्स, पॅकिंग एक्स्पर्टस, कॉस्च्युम डिझाईनर्स, ग्राफिक डिझाईनर्स, कोरिओग्राफर्स, फोटो आणि व्हिडिओ शूटिंग अशा अनेकजणांचा समावेश आहे.

हे काम ठरवताना सुरुवातीला वधूवर आणि त्यांचे आईवडील यांच्याबरोबर अनुजा यांची पहिली मीटिंग होते. आपलं लग्न कसं व्हावं याबाबत बऱ्याचदा वधूवरांच्या मनात अनेक रोमँटिक कल्पना असतात. त्या प्रत्यक्षात येण्यासारख्या असतातच असं नाही. पण सुरुवातीच्या चर्चांमध्ये थेट नकार देण्यापेक्षा त्यांच्या अपेक्षा जाणून घेणं महत्त्वाचं ठरतं. पुढच्या मीटिंग्जमध्ये घरातले इतर नातेवाईकसुद्धा सामील होतात. त्या सगळ्यांशी बोलल्यानंतर एका साधारण स्वरुप ठरवलं जातं. त्यात अनुजा यांच्याकडून नेमकी कोणत्या कामांमध्ये मदत हवी आहे, डेकोरेशन कसं हवं आहे वगैरे गोष्टी ठरवल्या जातात. काही दिवसांनंतर अनुजा त्यावर काम करुन त्याचं साधारणपणे बजेट किती होईल आणि ते काम कसं होईल याची कल्पना देतात. त्यावर पुन्हा उलटसुलट चर्चा होतात आणि कामाची फायनल ऑर्डर मिळते. या सगळ्या काळात क्लाएंट्स मीटिंग ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे असं अनुजा सांगतात. न कंटाळता वारंवार मीटिंग्ज केल्यानं नेमक्या अपेक्षा आणि आपण त्या

पूर्ण करु शकणार आहोत का याचा अंदाज येतो. अनुजा तर आता चक्क त्या कुटुंबातील सभासद आणि त्यांची टीम यांचा एक व्हॉट्स ॲप ग्रुप बनवतात. नंतरच्या चर्चा त्यावर करणंही सोपं होतं. या सगळ्यात अनेकदा अनुजा आणि त्यांची टीम क्लाएंटला आपल्या घरचीच मंडळी वाटायला लागतात. क्लाएंटबरोबर अशा पद्धतीचे संबंध तयार झाले की कामाबद्दलची स्पष्टता येत जाते. ही स्पष्टता आली की ते काम पूर्ण झाल्यावर दोघांनाही जे समाधान मिळतं, ते व्यवहारांपलीकडचं असतं.

ऑर्डर मिळाली की संबंधीत सर्व उद्योजकांशी संपर्क करणं, त्यांच्या आणि क्लाएंट्सच्या मीटिंग्ज आयोजित करणं वगैरे गोष्टी सुरु होतात. विवाहस्थळ निश्चित करण्याची जबाबदारी अनुजा यांच्याकडे असेल तर त्या चक्क एखाद्या दिवसाची छोटी ट्रीपच आयोजित करतात. त्या दिवसभरात क्लाएंटला त्या वेगवेगळी ठिकाणं प्रत्यक्ष नेऊन दाखवतात. त्यानंतर डेकोरेशनसाठी डिझाईन्स बनवून घेतली जातात. प्रत्यक्षात ती कशी दिसतील हे त्यामुळे लक्षात यायला मदत होते. क्लाएंटला ती दाखवून एका डिझाईनवर शिक्कामोर्तब केलं जातं. मग विवाहस्थळावर तो सेट, ते डेकोरेशन कसं दिसेल यासाठी काम सुरु होतं. त्यासाठी लागणाऱ्या साहित्याची जुळवाजुळव आणि कारागीर यांच्याशी चर्चा होतात. त्याचं एक छोटं मॉडेल बनवून बघितलं जातं. त्यामुळे ते प्रत्यक्ष लग्नाच्या वेळी करताना काय अडचणी येऊ शकतात याचा अंदाज येतो. असा सगळा गृहपाठ झाल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु होतं. त्यात मुख्य भाग एकाच वेळी अनेक लोकांशी संपर्कात राहणं आणि त्यांची कामं चोखपणे वेळेत होत आहेत ना याकडे लक्ष देणं हाच असतो. यातला एखादा पुरवठादार जरी वेळेत काम करत नसेल अथवा कामाची गुणवत्ता देत नसेल तर त्याला पर्यायी व्यवस्था ताबडतोब उभी करणं जरुरी असतं. मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ हाताळणं हे एक अत्यंत जोखमीचं काम हा इव्हेंट मॅनेजमेंटमधला तुलनेनं अवघड भाग आहे. पण

इव्हेंट मॅनेजमेंट, मग ती लग्नासाठी असो अथवा अन्य कुठल्या कार्यक्रमासाठी, त्यातील धोके आधी ओळखून त्यावर पर्यायी व्यवस्था, उपाययोजना काय करता येईल याचा हा व्यवसाय करताना विचार करावा लागतो. आयत्या वेळेला लाईट गेले, फुलं किंवा डेकोरेशनचं इतर साहित्य वेळेत पोहोचलं नाही तर काय करायला हवं याचा विचार आधीपासून झाला असेल तर फजिती टाळता येते. तसंच लाईटिंगचा वापर मोठ्या प्रमाणात असेल तर सुरक्षेच्या दृष्टीनेही उपाययोजना ठरवाव्या लागतात. शॉर्ट सर्किट होणं, सेट कोसळणं अशा आपत्ती दुर्दैवाने आल्या तर त्यातून झटकन मार्ग काढून क्लाएंटच्या आनंद सोहळ्याला गालबोट लागणार नाही याची काळजी घ्यायला लागते. त्याचबरोबर अशा आपत्तींमध्ये आपलंही नुकसान होऊ नये यासाठी तात्पुरत्या विम्याची सोय करावी लागते.

संवादकौशल्यानं आणि अनुभवानं ते कसब मिळवता येतं. अनुजा यांनी ते उत्तमरित्या साध्य केलेलं आहे.

त्यामुळेच त्यांच्याकडे झालेल्या लग्नांची संख्या आता शेकड्याहून अधिक आहे. अलीकडेच १८,००० लोक उपस्थित असलेला एक प्रचंड मोठा विवाह सोहळा त्यांनी केला. संगमनेरसारख्या छोट्या शहरात झालेला या सोहळ्याच्या इव्हेंट मॅनेजमेंटचं खूप कौतुक झालं. यावरुनच अनुजा यांच्या कामाची गुणवत्ता लक्षात येते. लग्नाचा हंगाम वर्षातले काही महिनेच असला तरी अनुजा यांचं काम मात्र पूर्ण वर्षभर चालू असतं. कारण प्रत्येक कामामधला युनिकनेस जपण्यासाठी सतत नावीन्यपूर्ण कल्पना अमलात आणाव्या लागतात. त्यावर सतत ट्रायल अँड एरर पद्धतीने काम करत राहणं आवश्यक ठरतं. हा सराव आवश्यक असतो. कामातला वेगळेपणा या सरावामुळे अधोरेखित होतो.

अनुजा अभ्यंकर मराठी विवाहसोहळे तर करतातच पण त्याशिवाय बंगाली, काश्मिरी, पंजाबी अशा इतर प्रांतातल्या लग्नांचे सोहळेही त्यांनी यशस्वीरित्या पार पाडले आहेत. मोजक्या लोकांच्या उपस्थितीपासून हजारो लोकांच्या उपस्थितीतले भव्यदिव्य सोहळे केलेले आहेत. कमीत कमी बजेटपासून अवाढव्य बजेटमधले दिमाखदार सोहळे केले आहेत. (काही लाखांच्या बजेटपासून काही कोटींचं बजेट इतकी मोठी ही रेंज आहे.) इतक्या अनुभवानंतर साहजिकच कामातला युनिकनेस आणि परिपूर्णता वाढत आहे.

लग्नाच्या इव्हेंट मॅनेजमेंटमध्ये कल्पनाशक्तीला, सौंदर्यदृष्टीला, सर्जनशीलतेला खूपच महत्त्व आहे. त्याचबरोबर भरपूर वेळ देऊन प्रत्येक काम करावं लागतं. कामाच्या निश्चित अशा वेळा ठरवता येत नाहीत. ग्राहकांबरोबर आणि इतर पूरक व्यापारी-पुरवठादार यांच्याबरोबर सतत संवाद आणि संपर्क ठेवावा लागतो. तंत्रज्ञानाच्या मदतीने यातली बरीचशी कामं सोपी होतात. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करता येणं आवश्यक ठरतं. हे सगळं ज्यांना शक्य आहे त्यांना या व्यवसायात भविष्यकाळात प्रचंड संधी आहेत. कामाच्या स्वरुपावरुन यात पैसा कमीअधिक मिळत असला तरी आपल्या कामात गुणवत्ता असेल तर उत्तम उत्पन्न हा व्यवसाय मिळवून देतो. सुरुवातीला त्यासाठी फारशा भांडवलाची गरज नसते. घरातूनही काम सुरु करता येतं. स्वत:चा स्टाफ नेमला नाही तरी बाहेरुन शक्य ती मदत घेता येते. शिवाय सुरुवातीला पूर्ण इव्हेंट मॅनेजमेंट शक्य नसेल तरी त्यात अंतर्भूत असणाऱ्या कोणत्याही एका कामाने सुरुवात करता येते आणि हळूहळू कामाचा आवाका वाढवता येतो. एकमेकांच्या संदर्भातून कामं मिळवता येतात. तसंच

कार्यालयांना आणि इतर विवाहस्थळांना कल्पना दिली तर तेही त्यांच्याकडे होणाऱ्या लग्नांच्या इव्हेंट मॅनेजमेंटसाठी नाव सुचवू शकतात. या व्यवसायात स्पर्धा असली तरी कामातील कौशल्य आणि वेगळेपणा यावर सतत कामाचा ओघ चालू ठेवता येतो.

लग्न हा प्रत्येकाच्याच आयुष्यातला एक महत्त्वाचा प्रसंग असतो. त्यामुळेच तो अविस्मरणीय ठरावा अशी स्वाभाविक इच्छा असते. सिनेमात दाखवतात तसा देखणा तर हवाच असतो पण त्याचवेळी त्यातल्या प्रथा-परंपरा यांना धक्का लागणार नाही याची काळजी घ्यावी लागते. त्या प्रसंगातले भावनिक बंध जपण्याची जबाबदारी असते. अनुजा अभ्यंकर आणि त्यांच्या रॉयल वेडिंग्जची टीम हे सगळं आत्मीयतेने करते. त्यामुळेच त्यांच्याकडे लग्नसोहळ्याची जबाबदारी सोपवण्यासाठी लोकांची गर्दी झाली नाही तर नवल!

संपर्क :
९८५००४५१८०
royal-weddings-in